Department of Agriculture
Government of Maharashtra

The World bank assisted

## Hon. Balasaheb Thackeray Agribusiness & Rural Transformation (SMART) Project

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

# शेतमालाच्या संभाव्य किंमतींचा सुधारित अंदाज अहवाल

# (ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४)


## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम व्यवस्थापन कक्ष, पुणे

## प्रकल्प अंमलबजावणी कक्ष –कृषी


**ऑगस्ट -२०२४**

**बाजार माहिती आणि जोखीम निवारण कक्ष** — **ऑगस्ट - २०२४**

**मका** हे आंतराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे अन्नधान्य पीक आहे. अमेरिका, चीन, ब्राझील, अर्जेंटिना आणि भारत या देशात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. भारतात मका खरीप, रब्बी आणि उन्हाळी अश्या तिन्ही हंगामात घेतली जाते. प्रमुख मका उत्पादक राज्यांमध्ये मध्य प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश आदी राज्यांचा समावेश होतो.भारतात मक्याचा वापर हा मुख्यतः पोल्ट्री खाद्य, पशुखाद्य यासाठी केला जातो. या भारतात मक्याची मागणी, पुरवठा व उपभोग या घटकांमध्ये होणाऱ्या बदलाचा मक्याच्या किंमतीवर परिणाम होत असतो.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार सन २०२४-२५ मध्ये, जगात मागील वर्षांच्या तुलनेत ०.६ टक्के मक्याचे उत्पादन घट होण्याच्या अंदाज आहे.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार सन २०२३-२४ मध्ये, भारतात मागील वर्षांच्या तुलनेत १.५ टक्के मक्याचे उत्पादन घट होण्याच्या अंदाज आहे. तसेच सन २०२४-२५ मध्ये मक्याचे उत्पादन सन २०२३-२४ प्रमाणे समान राहील असा अंदाज आहे.

केंद्र सरकारने दि. २६ जून २०२४ रोजी एकुण ५ लाख टन मका आयातीची अधिसूचना जाहीर केली आहे.





केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या तिसऱ्या अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार राज्यात सन २०२३-२४ मध्ये एकूण मक्याचे उत्पादन मागील वर्षीच्या तुलनेत ३८.८१ टक्क्यांनी घट होण्याचा अंदाज आहे.

खरीप हंगाम २०२३-२४ मध्ये मक्याच्या उत्पादन १४.३९ लाख टन होईल असा अंदाज आहे, जे गेल्या वर्षीच्या तुलनेत तो ५३% कमी आहे.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार मक्याची निर्यात २०२४-२५ मध्ये ६ लाख मेट्रिक टन होण्याचा अंदाज आहे, जी २०२३-२४ च्या तुलनेत २५% घट होईल असा अंदाज आहे.

देशांतर्गत किंमती वाढल्यामुळे आणि पिक कमी झाल्यामुळे २०२३-२४ या कालावधीत भारताची मका निर्यात चार वर्षांच्या निचांकी पातळीवर घसरली. इथेनॉल, कुक्कुटपालन आणि स्टार्च उत्पादकांकडून वाढलेल्या मागणीमुळेही निर्यातीत घट झाली.




देशात चालू वर्षीच्या जुलै २०२४ मध्ये मक्याची आवक मागील वर्षीच्या जुलै २०२३ च्या तुलनेत २५.४३ टक्क्यांनी वाढले आहे.




* ऑगस्ट, २०२४ ची किंमत दि. २० ऑगस्ट पर्यंतची आहे.)

मागील तीन वर्षातील नांदगाव बाजारातील मक्याच्या जुलै ते सप्टेंबर महिन्यातील सरासरी किंमती पुढील प्रमाणे.


ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१ - रुपये १५२७ प्रति क्विंटल
ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ - रुपये १८७७ प्रति क्विंटल
ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ - रुपये २००० प्रति क्विंटल

खरीप हंगाम २०२४-२५ साठी मका पिकाची आधारभूत किंमत (MSP) रु. २२२५ प्रति क्विं. इतकी जाहीर करण्यात आलेली आहे.


**ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४ महिन्यासाठी मक्याचे नांदगाव बाजारातील किंमत अंदाज पुढील प्रमाणे रुपये २००० ते २५०० प्रति क्विंटल**

**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष** **ऑगस्ट २०२४**


**तूर:** भारत हा जगातील सर्वात मोठा तूर उत्पादक तसेच उपभोक्ता देश आहे. भारतातील तूर उत्पादनात महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश राज्यांचा वाटा ६० टक्के पेक्षा जास्त आहे. तूरीच्या बाजारपेठेवर मागील वर्षातील तूर साठा, आयात तसेच चालू वर्षातील उत्पादन यांचा परिणाम होताना दिसतो. केंद्र शासनाने तूर निर्यातीसाठी खुली केली असून तूरीचा आयात कोटा मर्यादित ठेवलेला आहे.




माहे डिसेंबर ते एप्रिल हा तुरीचा प्रमुख विक्री हंगाम असतो. चालू वर्ष ऑगस्ट २०२३-२४ मधील तुरीची आवक मागील वर्षाच्या तुलनेत कमी राहिलेली दिसून येत आहे. ऑगस्ट २०२४ (२१ ऑगस्ट २०२४ पर्यंत) मध्ये १.६ लाख टन आहे, जी मागील वर्षी याच कालावधीत ३.३ लाख टन होती.





तूर हे खरीप पिक असून त्याची पेरणी जून ते जुलै व काढणी डिसेंबर ते फेब्रुवारी या दरम्यान केली जाते. भारत सरकारने जाहीर केलेल्या नवीन उत्पादन अंदाजानुसार सन २०२३-२४ मध्ये तुरीचे उत्पादन सुमारे ३३.३९ लाख टन होण्याची शक्यता आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत जवळपास सारखेच असल्याचे दिसून येत आहे. तसेच महाराष्ट्रातील २०२२-२३ मधील उत्पादन ८.६ लाख टनांवरून सन २०२३-२४ मध्ये ८.७ लाख टनांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.




डिसेंबर २०२२ पासून तुरीच्या किंमती वाढत आहेत. गतवर्षीच्या दरापेक्षा चालू वर्षी तुरीचे भाव जास्त आहेत.मागील तीन वर्षातील लातूर बाजारपेठेतील तुरीच्या ऑक्टोबर ते डिसेंबर मधील सरासरी किंमती खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१: | रु. ५,९५०/क्विंटल |
| ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२: | रु. ७,१८४/क्विंटल |
| ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३: | रु.१०,०७२/क्विंटल |

सध्याच्या हंगामासाठी सरकारने खरीप २०२४-२५ साठी जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा (रु. ७५५०/क्विंटल) सध्याच्या तुरीच्या किंमती जास्त आहेत.




मागील वर्ष २०२२-२३ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये आयात कमी झालेली आहे तर निर्यात वाढलेली आहे

## लातूर बाजारातील संभाव्य किंमती


**ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४: १०,००० ते १२००० /क्विं**

**(गेल्या वर्षांच्या तुलनेत चालू वर्षातील आयात जास्त राहील असे गृहीत धरून हा अंदाज वर्तविण्यात आला आहे)**

सदर संभाव्य अंदाज हा FAQ ग्रेड च्या तरीसाठी आहे


## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष — ऑगस्ट २०२४

**हरभरा:** हरभरा हे भारतातील मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि उपभोग असणारे डाळवर्गीय पिक आहे. जागतिक पातळीवर एकूण डाळ उत्पादनापैकी २० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. भारत, ऑस्ट्रेलिया, तुर्की, म्यानमार, पाकिस्तान आणि इथिओपियासह सहा देश जागतिक हरभरा उत्पादनात सुमारे ९० टक्के योगदान देतात. भारत हा हरभऱ्याचा प्रमुख उत्पादक देश असून जगातील एकूण उत्पादनात भारताचा वाटा सुमारे ७०-७५ टक्के आहे. भारतातील एकूण डाळ उत्पादनापैकी ४०-५० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. देशभरात हरभऱ्याचा वापर डाळ व बेसन या दोन्ही स्वरूपात केला जातो.





हरभरा हे रब्बी पिक असून त्याची पेरणी ऑक्टोबर ते नोव्हेंबर व काढणी मार्च ते एप्रिल या दरम्यान केली जाते. भारत सरकारने जाहीर केलेल्या नवीन उत्पादन अंदाजानुसार सन २०२३-२४ मध्ये हरभऱ्याचे उत्पादन सुमारे १२१.६ लाख टन होण्याची शक्यता आहे जे मागील वर्षीच्या तुलनेत जवळपास सारखेच असल्याचे दिसून येते.


महाराष्ट्रातील २०२१-२२ मधील उत्पादन २७.२ लाख टनांवरून सन २०२२-२३ मध्ये २७.७ लाख टनांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.




मागील वर्ष २०२२-२३ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये आयात वाढलेली आहे तर निर्यात कमी झालेली आहे




मार्च ते मे हा हरभऱ्याचा प्रमुख विक्री हंगाम असतो. चालू वर्ष ऑगस्ट २०२३-२४ मधील हरभऱ्याची आवक मागील वर्षाच्या तुलनेत कमी झालेली दिसून येत आहे. ऑगस्ट २०२४ (२१ ऑगस्ट २०२४ पर्यंत) मध्ये ती ०.७ लाख टन इतकि आहे, जी मागील वर्षी याच कालावधीत ०.९ लाख टन इतकी होती.




ऑक्टोबर २०२२ पासून हरभऱ्याच्या किंमती वाढत आहेत. ऑगस्ट २०२३ नंतर, त्या भारत सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा जास्त आहेत.

मागील तीन वर्षातील लातूर बाजारपेठेतील हरभऱ्याच्या ऑक्टोबर ते डिसेंबर मधील सरासरी किंमती खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१: | रु. ४,५६९/क्विंटल |
| ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२: | रु. ४,४५०/क्विंटल |
| ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३: | रु. ५,७३६/क्विंटल |

सध्याच्या रब्बी हंगामासाठी हरभऱ्याची सरकारने जाहीर केलेली किमान आधारभूत किंमत रु. ५४४०/क्विंटल आहे.


## लातूर बाजारातील संभाव्य किंमती

### ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४: रु. ६,००० ते ८,०००/क्विं


सदर संभाव्य अंदाज हा FAQ ग्रेड च्या हरभऱ्यासाठी आहे

बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष — ऑगस्ट- २०२४


**सोयाबीन:** सोयाबीन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे तेलबिया पिक आहे. अमेरिका, ब्राझील, आर्जेन्टिना, चीन व भारत या देशात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. या प्रमुख देशातून जागतिक उत्पादनाच्या सुमारे ९० टक्के सोयाबीनचे उत्पादन होते. त्यामुळे या देशातील सोयाबीनची मागणी,पुरवठा व उपभोग या घटकामध्ये होणाऱ्या बदलाचा सोयाबीनच्या किमतीवर परिणाम होत असतो.





भारतात सन २०२४-२५ मध्ये सोयाबीनचे उत्पादन १२८ लाख टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तीवली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत ८ टक्केनी अधिक आहे. ( स्त्रोत: WASDE, USDA, ऑगस्ट २०२४)





अमेरिकन कृषी विभागाच्या, (WASDE, ऑगस्ट २०२४) अहवालानुसार सन २०२४-२५ मध्ये, जगात ४२२६ लाख टन सोयाबीनचे उत्पादन होण्याची शक्यता वर्तविली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत ८.५ टक्केनी (३९५९ लाख टन, २०२३-२४) अधिक आहे.





सन २०२३-२४ मध्ये सोयामीलच्या निर्यातीत मागील वर्षाच्या तुलनेत वाढ झाली आहे. चालू वर्षी एप्रिल ते जून २०२४ मध्ये ४.९७ लाख टन सोयापेंड निर्यात झाली आहे. (स्रोत:SEAअहवाल,जुलै२०२४)




चालू वर्षी नोव्हेंबर २०२३ ते जून २०२४ या कालावधीत १८.६८ लाख टन सोयातेलाची आयात झाली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत कमी आहे. (स्रोत: SEA अहवाल, जुलै २०२४).




मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षात सोयाबीनची मासिक बाजारात आवकमध्ये एप्रिल २०२४ पासून वाढ झाली आहे. ( स्रोत: Agmarknet)




मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षी सोयाबीनच्या किंमती कमी आहेत. ( स्रोत: Agmarknet). मागील तीन वर्षातील ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीतील महिन्यातील सरासरी किंमती खालील प्रमाणे होत्या:

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१: रु.५९८० प्रती क्विंटल.
ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२: रु. ५४२५ प्रती क्विंटल.
ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३: रु. ४८५४ प्रती क्विंटल.

सन २०२४-२५ हंगामासाठी किमान आधारभूत किंमत रु. ४८९२ प्रती क्विंटल आहे.

## लातूर बाजारातील संभाव्य किंमती –


## ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४ : रु. ४३०० ते ५००० प्रती क्विंटल

सदर संभाव्य किंमत अंदाज हा FAQ ग्रेडच्या सोयाबीनसाठी आहे.

**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष** **ऑगस्ट २०२४**


## कापूस

कापूस हे भारतातील सर्वात महत्त्वाचे व्यावसायिक पीक आहे जे 'व्हाइट-गोल्ड' म्हणून ओळखले जाते. जागतिक स्तरावर चीन आणि यूएसए नंतर भारत हा कापूस उत्पादन करणारा प्रमुख देश असून एकूण जागतिक कापूस उत्पादनापैकी २५% वाटा भारताचा आहे.





USDA-FAS च्या अंदाजानुसार विपणन वर्ष २०२४-२५ मध्ये भारतातील कापूस उत्पादन २५.४ दशलक्ष ४८० lb bales आहे., शेतकरी कापूस लागवडीचे क्षेत्र डाळी, मका आणि भात यासारख्या उच्च परतावा पिकांकडे वळवतील या अपेक्षेमुळे पेरणी केलेल्या १२.४ दशलक्ष हेक्टर क्षेत्रावरील गाठी मागील वर्षाच्या तुलनेत दोन टक्क्यांनी कमी झाल्या आहेत.


(Source: USDA –Cotton Outlook) (स्रोत:USDA –Cotton Outlook)





कापणीच्या क्षेत्रफळाच्या वाढीमुळे 2024/25 मध्ये जागतिक उत्पादन 115.9 दशलक्ष गाठीपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. एकूणच, गेल्या महिन्यात आर्थिक दृष्टीकोन सुधारल्यामुळे 2024/25 विपणन वर्षासाठी जागतिक कापसाच्या मागणीचा दृष्टीकोन अधिक सकारात्मक आहे.




राष्ट्रीय आयात आणि निर्यातीच्या बाबतीत , मागील वर्षाच्या तुलनेत २०२३-२४ मध्ये आयातीत आणि निर्यातीत वाढ होण्याचा अंदाज आहे. हाच कल जागतिक पातळीवर दिसला असून मागील वर्षीच्या तुलनेत आयात व निर्यातीमध्ये सरासरी ६% वाढ झाली आहे.




महिन्यात बाजारात कापसाची आवक गतवर्षीप्रमाणेच असल्याचे दिसून येत आहे.




अकोला बाजारपेठेत कापसाचे भाव किमान आधारभूत किमतीपेक्षा जास्त आहेत. मागील तीन वर्षातील ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीतील कापसाच्या किमती पुढील प्रमाणे

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१ - रु ७,९३९ प्रति क्विंटल
ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ – रु ८,७६२ प्रति क्विंटल
ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ – रु ७,०७५ प्रति क्विंटल

**ऑक्टो. ते डिसें. २०२४ या कालावधीसाठी कापसाच्या किमती अंदाजे रु. ७,००० ते ८,००० प्रति क्विंटल राहतील.**

टीप: *सदर अहवाल हा बाजाराची सद्यस्थिती व भविष्यकालीन किंमतीविषयक अनुमान दर्शवितो. आंतरराष्ट्रीय किंमती, हवामान, आर्थिक घटक, आणि सरकारी धोरण यामध्ये होणाऱ्या बदलामुळे संभाव्य किंमतीमध्ये बदल होऊ शकतो. परिणामी वास्तविक किंमती या संभाव्य किंमती पेक्षा वेगळ्या असू शकतात. त्यामुळे वाचकांनी या अहवालाचा काळजीपूर्वक वापर करावा*


अधिक माहितीसाठी

**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम व्यवस्थापन कक्ष, पुणे**

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**

एम.एस.एफ.सी बिल्डींग, २७० भाम्बुर्डा, नारायण एस.बी.मार्ग,

सिंबायोसिस कॉलेज, गोखले नगर, पुणे ४११०१६

फोन: ०२०-२५६५६५७७, टोल फ्री: १८०० २१० १७७०, ई-मेल: mirmc.smart@gmail.com

वेबसाईट: https://www.smart-mh.org